# येरगी यथे श्रमदानातून केवळ स्वच्छता नव्हे तर अहंकार नष्ट होतो

## उपविभागीय पोलीस अधिकारी -संकेत गोसावी

**दै.चालु वार्ता, देगलूर, प्रतिनिधी,**
**◀ संतोष मंनधरणे ▶**



**नांदेड (देगलूर) :** देगलूर तालुक्यातील चालुक्यकालीन नगरी मौ.येरगी येथ श्रमदानातून केवळ स्वच्छता नव्हे तर अहंकारही नष्ट होतो. अलीकडच्या काळात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासासाठी नैतिक मूल्य, श्रमसंस्कार, ध्येयवाद, जिद्द, सचोटी व प्रामाणिकपणा हे सद्गुण रुजविणे आवश्यक आहे. व्यक्तिमत्व विकास याविषयी उदाहरण सांगताना ते म्हणाले मुर्तीकाराद्वारे मूर्ती निर्माण कार्य करीत असताना जो दगड सतत घाव सहन करतो तो दगड कालांतराने भगवंताची मूर्ती म्हणून तयार होतो व लोक त्याची श्रद्धेने पूजा करीत असतात परंतु जो दगड घाव सहन करीत नाही, त्रास सहन करीत नाही तो दगड नारळ फोडण्याचा दगड बनत असतो. त्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कठीण परिश्रम करीत अखंडपणे अभ्यास केला पाहिजे व त्याच बरोबर कोणतेही श्रम करण्यास तत्पर असले पाहिजे कारण श्रमदानातून केवळ 'स्वच्छता नव्हे तर अहंकार नष्ट होतो. असे प्रतिपादन देगलूरचे उप विभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी यांनी व्यक्त केले. ते देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने येरगी येथे आयोजित केलेल्या विशेष शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष जनार्दन चिद्रावार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्यकारी मंडळाचे सदस्य देवेंद्र मोतेवार, सरपंच संतोष पाटील, उपप्राचार्य अनिल चिद्रावार, उपप्राचार्य उपप्राचार्य एम एम पटेल, उपप्राचार्य डॉ व्ही जी शेरीकर पर्यवेक्षक संग्राम पाटील आणि रासेयो जिल्हासमन्वयक प्रा. हानमंतकर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.संजय देबडे हे व्यासपीठावर उपस्थित होते. सर्व प्रथम म.गांधी आणि संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.संजय देबडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे हणमंत यशवंतकर यांनी रासेयो शिबीरातुन विद्यार्थी कसा घडतो हे विविध उदाहरणे देऊन सांगितले. या प्रसंगी संचालक मंडळाचे सदस्य देवेंद्र मोतेवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात संस्थेचे उपाध्यक्ष जनार्दन चिद्रावार यांनी विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना शुभेच्छा दिल्या.प्रस्तुत शिबीर हे दिनांक ३ जानेवारी ते ९ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये मौजे येरगी तेथे संपन्न होत असून हे विशेष शिबीर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.संजय देबडे डॉ.व्यंकट खंदकुरे प्रा.गणेश क्यादारे डॉ.संतोष येरावार, प्रा. शिवचरण गुरुडे यांच्यासह रासेयो सल्लागार समितीचे सर्व सदस्य व स्वयंसेवक विशेष शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

Scanned with OKEN Scanner